महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: सीएमए-०४२५/प्र.क्र.१२८/२०२५/जाहिरात दिनांक: २१ ऑगस्ट, २०२५

# -: शुद्धिपत्रक :-

## विषय:- महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५
## (जाहिरात क्रमांक: ११७/२०२५)

शासनाच्या विविध विभागाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ करीता दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक-११७/२०२५) व दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू असताना अतिवृष्टीमुळे तसेच अन्य कारणामुळे जाहिरातीमध्ये नमूद आवश्यक कागदपत्रे मिळण्यास उमेदवारांना अडचणी निर्माण होत असल्याने अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी अशा विनंतीची निवेदने काही उमेदवारांकडून प्राप्त झाली आहेत.

३. उपरोक्त बाब विचारात घेता प्रस्तुत जाहिरातीकरीता अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ पर्यंत |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक ३० ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ पर्यंत |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

४. दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द मूळ जाहिरातीमधील तसेच, दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रसिध्द शुध्दिपत्रकांमधील इतर तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

५. सदर शुध्दिपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ११७/२०२५ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात

ठिकाण: नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग